**शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहांसाठी सोलर वॉटर हिटर खरेदी व बायोमेट्रिक यंत्रणा बसविणे तसेच अनुदानित आश्रमशाळांना बायोमेट्रिक यंत्रणा बसविणे या प्रकरणांची चौकशी.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः शाआशा -२०१४/ प्र. क्र. १५७ /का-१३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई:- ४०० ३२.
दिनांक :- २८ ऑगस्ट, २०१४.

**वाचा :-** शासन निर्णय, क्र: शाआशा- २०१४/ प्र.क्र.१५७ / का-१३, दिनांक १६-०४-२०१४.

**प्रस्तावना :-**

शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहांसाठी सोलर वॉटर हिटर खरेदी व बायोमेट्रिक यंत्रणा बसविणे तसेच अनुदानित आश्रमशाळांमध्ये बायोमेट्रिक यंत्रणा बसविणे या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी संदर्भाधीन दि. १६-०४-२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांची एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीस अहवाल सादर करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये देण्यात आलेला होता. सदर कालावधी दि.१५-०७-२०१४ रोजी संपला आहे. सदर प्रकरणाची चौकशी पुर्ण करण्याकरिता तसेच अहवाल सादर करण्यास सहा महिन्यांचा कालावधी वाढवून देण्याची विनंती सचिव तथा चौकशी समिती अध्यक्ष यांनी केलेली आहे. सदर विनंती विचारात घेता चौकशी समितीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहांसाठी सोलर वॉटर हिटर खरेदी व बायोमेट्रिक यंत्रणा बसविणे तसेच अनुदानित आश्रमशाळांना बायोमेट्रिक यंत्रणा बसविणे या प्रकरणी चौकशी करण्यासाठी दि. १६-०४-२०१४ च्या शासन आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या एकसदस्यीय समितीस चौकशी अहवाल सादर करण्यासाठी ६ महिन्यांची म्हणजेच दि. १४-०१-२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१४०८२८१६२४१४९४२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Navnath Ravaji Wath

Digitally signed by Navnath Ravaji Wath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Navnath Ravaji Wath
Date: 2014.08.28 16:20:27 +05'30'

(नवनाथ वाठ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२. मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग , मंत्रालय, मुंबई.
५. सचिव व चौकशी समिती अध्यक्ष, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
७. सर्व सह सचिव / उप सचिव/अवर सचिव / कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
८. निवड नस्ती (का.१३), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

------------------